




दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • २३१ • RNI : MAHMAR/2023/87818 • शुक्रवार दि.२७ जून २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.



Agro. Tourism & Adventure Park
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क
कोळोणा (घोडेगाव), पुलगाव जवळ, ता. देवळी जि. वर्धा


# शेतकऱ्यांचा कर्जाचा डोंगर वाढवणारी वीज वितरण कंपनी!

## माधव जिवतोडेंनी दाखल केली राज्य वीज नियामक आयोगाकडे तक्रार

## चंद्रपूरमधून राज्यभर गाजणाऱ्या या लढ्याचा सविस्तर वृत्तविशेष

### चंद्रपूरमधून सुरू झालेली लढाई राज्यभर गाजणार

**चंद्रपूरमधून सुरू झालेली ही लढाई आता राज्यभर गाजू लागली आहे. शेतकऱ्यांना न्याय मिळेपर्यंत लढा सुरूच राहणार असल्याचा निर्धार जिवतोडेंनी व्यक्त केला आहे.**

**चंद्रपूर (आशिष घुमे) : शेतकरी म्हणजेच अन्नदाते! मात्र, आजच्याच काळात शेतकरीच कर्जाच्या दलदलीत फसून आपला संसार उद्ध्वस्त करीत आहे. या समस्येला थेट वाचा फोडली आहे चंद्रपूर जिल्ह्यातील भद्रावती तालुक्यातील वडगाव (गुळगाव) येथील शेतकरी माधव केशव जिवतोडे यांनी. राज्य वीज वितरण कंपनीने कृषी पंपाच्या वीज जोडण्या वेळेवर न दिल्यामुळे शेतकरी कर्जबाजारी, मानसिक तणावाखाली आणि अगदी आत्महत्येपर्यंत ढकलले जात आहेत, असा आरोप जिवतोडेंनी राज्य वीज नियामक आयोगाकडे सविस्तर तक्रार दाखल करत केला आहे.**

कायद्यानुसार शेतकऱ्यांच्या कृषी पंपाच्या वीज जोडण्या नियोजित मुदतीत देणे राज्य वीज वितरण कंपन्यांची जबाबदारी आहे. मात्र या जबाबदारीकडे लक्षच दिले जात नसल्याचा जिवतोडेंनी आरोप केला आहे. त्यांच्या तक्रारपत्रात म्हटले आहे की, वीज जोडण्या विलंबाने दिल्यामुळे शेतकऱ्यांना आपले पीक वाचवण्यासाठी खासगी सावकारांकडून कर्ज घ्यावे लागले आहे. कर्जाच्या दलदलीत रुतून अनेक शेतकऱ्यांची घरे विकली जात आहेत, तर काही जण आत्महत्येसारख्या टोकाच्या पर्यायाचा विचार करत आहेत.

जिवतोडेंनी तक्रारीत वीज अधिनियम २००३चा हवाला देत म्हटले आहे की, या नियमांनुसार प्रत्येक दिवसाच्या विलंबास शेतकऱ्यांना १,००० रुपये नुकसानभरपाई मिळायला हवी. मात्र राज्य वीज वितरण कंपन्यांनी या नियमाचा सपशेल अव्हेर केला आहे. शेतकऱ्यांच्या सहनशीलतेचा अंत पाहून या कंपन्यांनी आपली जबाबदारीच झटकून टाकली आहे.



### कठोर कारवाईच शेतकऱ्यांना न्याय देईल

माधव जिवतोडेंनी आपल्या तक्रारीत संबंधित वीज वितरण कंपन्यांच्या अधिकाऱ्यांविरुद्ध कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे. त्यांच्या या लढ्याला राज्यभरातून शेतकरी संघटनांचा पाठिंबा मिळत आहे. या मुद्द्याचा पाठपुरावा करण्यासाठी मुख्यमंत्री, ऊर्जा मंत्री, स्थानिक खासदार–आमदार आणि जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले आहे.

### हा लढा शेतकऱ्यांच्या जगण्यासाठी आहे

वीज वितरण कंपन्यांचा हलगर्जीपणा शेतकऱ्यांच्या जगण्याचा प्रश्न बनला आहे. शेतकऱ्यांचा आवाज प्रशासनाच्या कानापर्यंत पोहोचवण्यासाठीच हा लढा आहे. राज्य सरकारने तातडीने हस्तक्षेप करून शेतकऱ्यांना न्याय दिला पाहिजे,अशी भूमिका जिवतोडेंनी व्यक्त केली आहे.

---

## चंद्रपूर वाहतूक कोंडीस त्वरित उपाय हवा

# खा.प्रतिभा धानोरकर यांची बायपास मार्गासाठी नितीन गडकरींकडे मागणी



**चंद्रपूर (प्रतिनिधी)–शहराच्या मध्यवर्ती भागातून जाणारी राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक, वाढती लोकसंख्या आणि दिवसेंदिवस वाढणाऱ्या वाहनांमुळे चंद्रपूर शहरात वाहतुकीचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या समस्येवर कायमस्वरूपी उपाय म्हणून खासदार प्रतिभा धानोरकर यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांना पत्र लिहून चंद्रपूर बायपास मार्ग तातडीने मंजूर करण्याची मागणी केली आहे.**

धानोरकर यांनी आपल्या पत्रात स्पष्ट केलं आहे की, एनएच–९३० आणि एनएच–९३०ऊ या दोन्ही राष्ट्रीय महामार्गांवरील वाहतूक सध्या चंद्रपूर शहरातूनच जाते. परिणामी गडचिरोली, तेलंगणा, यवतमाळ, वर्धा आणि नागपूर आदी भागांतून येणारी वाहने शहरात प्रवेश करतात. यामुळे शहरात अपघातांचे प्रमाण वाढले असून रहदारीचे व्यवस्थापन कठीण झाले आहे.

त्यांनी सुचवलेल्या पडोली फाटा ते शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय या दरम्यान बायपास मार्ग तयार झाल्यास ही वाहतूक शहराबाहेरून वळवता येईल, ज्यामुळे शहरात वाहतुकीची कोंडी व अपघातांची शक्यता कमी होईल.

खासदार धानोरकर यांनी गडकरी यांना विनंती केली आहे की, चंद्रपूर शहराच्या सुरक्षितता व भविष्यकालीन विकासाला गती देण्यासाठी या प्रस्तावाला तातडीने मान्यता द्यावी. हा बायपास मार्ग केवळ चंद्रपूरकरांच्या सुरक्षिततेचा प्रश्न नसून, जिल्ह्याच्या भविष्यकालीन विकासाचाही केंद्रबिंदू ठरेल, असेही धानोरकर यांनी स्पष्ट केले आहे.

---

# अमृत योजनेचा बोजवारा;भाजपा आमदार आणि भाजपामहानगराध्यक्षांची नौटंकी

## काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष रितेश तिवारी यांचा आरोप

**चंद्रपूर (प्रतिनिधी)**–केंद्रात व राज्यात भाजपची सत्ता असून, चंद्रपूर महापालिकेत देखील त्याच पक्षाचे महापौर होते. त्यांच्या कार्यकाळात अमृत पाणीपुरवठा योजनेचा प्रारंभ करण्यात आला. मात्र या योजनेची अंमलबजावणी ढिसाळ झाली असून, पावसाळ्याचे कारण पुढे करून भाजपचे आमदार आणि महानगराध्यक्ष आता अमृत योजनेचे काम तात्पुरते थांबवण्यासाठी निवेदन देत आहेत, यासारखे दुर्दैव नाही, अशी टीका काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष रितेश (रामू) तिवारी यांनी केली आहे.



चंद्रपूर महानगरपालिकेमार्फत २०१७ मध्ये अमृत पाणीपुरवठा योजनेचा कार्यादेश देण्यात आला होता. २०१९ पर्यंत ही कामे पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र आज ८ वर्षे लोटून देखील अनेक भागांमध्ये पाइपलाइनचे काम अपूर्ण आहे. घराघरांत पाणी पोहोचलेले नाही. जलमापकांची व्यवस्था कोलमडली आहे. दुसरीकडे, शहरातील अनेक रस्त्यांचे खोदकाम करून ते तस्सेच सोडल्यामुळे नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.

सत्ताधारी भाजपने कंत्राटदारांशी संगनमत करून अमृत योजनेचे काम उशिरा, हलगर्जीपणे आणि बेफिकिरीने केले. काम अपूर्ण असूनही योजनेची तारीफ केली जात आहे. मात्र, त्यांना जनतेच्या तहानेची जाणीव नाही,असा हल्लाबोल रितेश तिवारी यांनी केला.चंद्रपूरचे आमदार अपक्ष असताना मोठमोठ्या घोषणा करीत होते. भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर आता तेच काम लांबणीवर टाकण्यात रस दाखवत आहेत. भाजप मनपा प्रशासकांच्या माध्यमातून स्वतःची कामे करून घेत असून, नागरिकांच्या कामांकडे दुर्लक्ष केले जात आहे. भाजप अमदार किशोर जोरगेवार यांच्या सूचनेनुसार, भाजपच्या शिष्टमंडळाने मनपा आयुक्तांना निवेदन देऊन पावसाळ्यापूर्वी सुरू असलेले काम तात्पुरते थांबवण्याची मागणी केली आहे. भाजपने यासाठी रस्त्यांची खराब अवस्था आणि पावसामुळे होणाऱ्या अडचणीचे कारण दिले आहे. हे निव्वळ राजकीय स्टंट असून अपयश झाकण्यासाठी भाजप हे नाट्य रचत आहे. ज्यांच्या सत्ताकाळात ही योजना सुरू झाली आणि कामे रखडली, त्याच भाजप आमदार आणि पदाधिकाऱ्यांना आता काम थांबवावे लागते, यासारखे दुर्दैव नाही.

चंद्रपूर शहरात अमृत योजनेमुळे रस्त्यांची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. जलवाहिनी आणि मलनिस्सारणाच्या कामांमुळे अपघातांची शक्यता वाढली आहे. तरीही भाजपचे नेते केवळ निवेदन देत आहेत, हे केवळ प्रसिद्धीसाठी नौटंकी करीत असल्याचा आरोप रितेश तिवारी यांनी केला आहे. यापुढे नागरिकांना वेठीस धरण्याचा प्रकार झाला तर काँग्रेस आंदोलन करण्यास मागेपुढे बघणार नाही, असा इशाराही रितेश तिवारी यांनी दिला आहे.

---

## मंथन'च्या कार्यक्रमासाठी शिक्षकांना सक्ती रद्द

# आमदार सुधाकर अडबाले यांच्या पत्रानंतर सुधारित पत्र निर्गमित

**चंद्रपूर (प्रतिनिधी)–मंथन या खासगी संस्थेतर्फे आयोजित शिक्षक परिसंवादाला नागपूर विभागातील सर्व विद्यापीठाद्वारे संचालित महाविद्यालयामधील प्राचार्य व अधिव्याख्याता यांना सदरील कार्यक्रमामध्ये सहभागी होणे अनिवार्य करण्यात आले होते. यावर आ.सुधाकर अडबाले यांनी भ्रमणध्वनी व पत्र देताच सहसंचालक यांनी सुधारित पत्र काढून त्यातून 'अनिवार्य' हा शब्द वगळण्यात आला.व शिक्षकांना उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले.**



शिक्षण क्षेत्रातील शासनाच्या अकरा वर्षांच्या धोरण अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी मंथन या खासगी संस्थेतर्फे 'शैक्षणिक परिवर्तनाचे ११ वर्ष' या विषयावर २७ जून २०२५ रोजी परिसंवाद नागपूर येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाला नागपूर विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिव्याख्याते यांना उपस्थित राहणे अनिवार्य करण्यात आले होते. तसे पत्र उच्च शिक्षण विभागाच्या सहसंचालकांनी काढले होते.एका खासगी संस्थेने आयोजित केलेल्या कार्यक्रमाला शिक्षकांना उपस्थित राहण्याची सक्ती केल्याने आमदार सुधाकर अडबाले यांच्याकडे तक्रारी प्राप्त झाल्या. त्यानंतर आमदार अडबाले यांनी तात्काळ उच्च शिक्षण विभाग नागपूरचे सहसंचालक यांना भ्रमणध्वनी करून तात्काळ पत्र रद्द करून ऐच्छिक करण्याच्या सूचना दिल्या. तसेच खासगी कार्यक्रम शासकीय दाखवून शिक्षकांना वेठीस धरणे योग्य नाही. त्यामुळे शिक्षकांना या कार्यक्रमास उपस्थित राहणे अनिवार्य करणारे पत्र रद्द करा, अशी मागणी पत्राद्वारे केली. त्यानंतर लगेच २४ तारखेला उच्च शिक्षण विभाग नागपूरचे सहसंचालक यांनी सुधारित पत्र काढले. त्यातून शिक्षकांच्या उपस्थितीसंदर्भात पूर्वीच्या पत्रात असलेला अनिवार्य शब्द वगळण्यात आला व त्याऐवजी सदर कार्यक्रमात शिक्षकांनी उपस्थिती नोंदवावी, असे सुधारित पत्र काढण्यात आले.

---

# कंत्राटदारांच्या थकीत सुरक्षा ठेव रकमेबाबत जिल्हा परिषदेत साप्ताहिक मोहिमेचा निर्णय

**चिमूर ।शेषराव राऊत**

चंद्रपूर जिल्ह्यात कंत्राटदारांकडून विविध विकासकामांसाठी जमा करण्यात आलेली अंदाजे ४० कोटी रुपयांहून अधिक सुरक्षा ठेव रक्कम अद्याप जिल्हा परिषदेकडे प्रलंबित आहे. कामाचा दोषदायित्व कालावधी पूर्ण झाल्यानंतर ही रक्कम कंत्राटदारांना तत्काळ परत मिळायला हवी, मात्र अनेक प्रकरणे दीर्घकाळ रखडली आहेत.

यासंदर्भात राज्य अभियंता संघटनेचे शिष्टमंडळ जिल्हा परिषद चंद्रपूरचे मुख्य वित्त व लेखा अधिकारी (कॅफो) गायकवाड यांना भेटून सविस्तर चर्चा केली. या बैठकीत संघटनेचे जिल्हाध्यक्ष इंजिनियर जगदीश लवाडिया यांनी या प्रश्नावर साप्ताहिक मोहिम राबविण्याचा सकारात्मक पर्याय सुचविला, ज्यास गायकवाड यांनी सहमती दर्शवली आहे. या मोहिमेसाठी जिल्ह्यातील उपविभागीय अभियंता कार्यालयांचे सहकार्य आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले.



इंजिनियर जगदीश लवाडिया यांनी म्हटले आहे की विकासकामे पूर्ण केल्यानंतर कंत्राटदारांची रक्कम वेळेवर परत मिळणे ही केवळ आर्थिक जबाबदारी नसून विश्वास टिकवण्याची प्रक्रिया आहे. सध्या ४० कोटी रुपयांहून अधिक रक्कम प्रलंबित राहणे उद्योगक्षेत्रासाठी अडचणीचे आहे. आम्ही प्रशासनासमोर हा मुद्दा मांडल्यानंतर समाधानकारक प्रतिसाद मिळाल्यामुळे कृतज्ञ असून साप्ताहिक मोहिमेद्वारे जिल्हा परिषदेकडून या प्रक्रियेला वेग येईल, असा विश्वास आहे.

राज्य अभियंता संघटना या मोहिमेची अंमलबजावणी प्रभावी होण्यासाठी तांत्रिक व व्यवस्थापकीय स्तरावर पाठपुरावा करणार आहे. तसेच, कंत्राटदारांना त्यांच्या प्रलंबित रकमेबाबत माहिती सत्र आयोजित करण्यात येणार आहे.

# संविधान आणि लोकशाहीची हत्या करणारी काँग्रेसी वृत्ती नष्ट करण्याचा संकल्प करावा

## आमदार सुधीर मुनगंटीवार यांचे 'संविधान हत्या दिवस'ला जनतेला आवाहन

## आणीबाणीला ५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल 'संविधान हत्या दिवस' कार्यक्रमाचे आयोजन





### 'वाकडी नजर मोडून काढा'

**काही पक्षांचे नेते असे आहेत की ज्यांनी आपलं कुटुंब सावरण्यासाठी देश सोडला, मात्र देशगौरव पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदीजींनी देश वाचविण्यासाठी परिवार सोडला. राष्ट्रभावना जीवंत ठेवण्याचे काम मोदीजींनी केले आहे. मा.मोदीजी कधीही देशाचे नुकसान होऊ देणार नाही. आता आपली जबाबदारी आहे, की चुकीच्या नजरांपासून देशाला वाचवायचे आहे. आपल्या स्वार्थासाठी कोणत्याही नेत्याने देशाकडे वाकड्या नजरेने बघू नये, याची काळजी घ्यायची आहे, असेही आ. मुनगंटीवार म्हणाले.**

**बल्लारपूर (प्रतिनिधी)**

सूर्य आणि चंद्रानंतरही आपली लोकशाही कायम राहिली पाहिजे, हा भाव आपण मनात ठेवला पाहिजे. देशाने आपल्याला काय दिले याऐवजी आपण देशाला काय दिले, याचा विचार केला पाहिजे. त्यासाठी ५० वर्षांपूर्वी या देशाने भोगलेली आणीबाणी आणि आणीबाणी लादणारे या दोन्ही गोष्टी आपल्याला कधीही विसरता येणार नाही. पुढच्या ५० वर्षांपर्यंत या लोकांना धडा शिकविण्याचा संकल्प करावा लागेल. संविधानाची आणि लोकशाहीची हत्या करणारी काँग्रेसी वृत्ती समूळ नष्ट करण्याचा संकल्प करावा लागेल, असे प्रतिपादन राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी केले.

आणीबाणीला ५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल बल्लारपूर येथील किल्ला वॉर्डमध्ये 'संविधान हत्या दिवस-२०२५' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यावेळी आ. श्री. सुधीर मुनगंटीवार बोलत होते. या कार्यक्रमाला भाजपाचे ज्येष्ठ नेते चंदन सिंग चंदेल, भाजपाचे जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा, अध्यक्ष रणंजय सिंग, काशिनाथ सिंग, मंगेश गुलवाडे, निलेष खरबडे, रेणुका दुधे, समीर केणे, मनीष पांडे, वैशाली जोशी, शिवचंद द्विवेदी, किरण बुटले, नम्रता ठेमस्कर, जयश्री मोहुर्ले, सारिका कणकम, वर्षा सुंचुवार, आरती आक्केवार आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी चंद्रसिंग लेंजे, विनायक बोरकर, भजनदास अलमस्त, नामदेव चन्ने, मोरेश्वर ठेकरे, मनोहर सहारे, शोभा भोयर, उद्धव निकुरे या आणीबाणी सेनानींचा सत्कार करण्यात आला. 'भोपाळ गॅस कांडमध्ये हजारो लोकांचे जीव जाणे, दंगलींमध्ये शीख बांधवांना प्राण गमवावे लागणे आणि सत्तेसाठी काँग्रेसने आणीबाणी लादणे या तीन गोष्टी हा देश कधीही विसरणार नाही,' असा उल्लेख आ. श्री. मुनगंटीवार यांनी सुरुवातीलाच केला.

आ. मुनगंटीवार म्हणाले, 'आणीबाणी हे एक दूष्टपर्व होते. पण माझा देश, माझ्या भागातील जनता गिधडांच्या धमक्यांना घाबरत नाही, याचा आनंद आहे. 'देश से है प्यार तो हर पल ये कहना चाहिए मै रहू या ना रहू, भारत ये रहना चाहिए', हा भाव प्रेरणादायी ठरला. स्व. इंदिरा गांधींनी संविधानाची हत्या करत आणीबाणी जाहीर केली. संविधानात राष्ट्र धोक्यात असेल किंवा युद्धामुळे अंतर्गत व्यवस्था बिघडली असेल तर त्यावेळी आणीबाणी लागू करता येते. मात्र, आणीबाणीच्या माध्यमातून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाचा कुण्या नेत्याने चुकीचा वापर केला असेल, त्या नेत्याचे नाव स्व. इंदिरा गांधी आहे.'

देशात महागाई वाढलेली होती. भ्रष्टाचार वाढलेला होता. सर्वसामान्य जनतेच्या मनात रोष होता. अनेक राज्यांना बरखास्त करण्यात आले. १९७२ नंतर भारतात उपासमारी वाढली होती. अशा हुकुमशाही वातावरणात १२ जून १९७५ ला न्यायालयाने इंदिरा गांधींची निवडणूक चुकीच्या पद्धतीने झाल्याचा ठपका ठेवला. पैसा वाटल्याचे, सरकारी यंत्रणेचा चुकीचा वापर झाल्याचे तथ्य पुढे आले होते. न्यायालयाने त्यांचे सदस्यत्व रद्द केले. इंदिरा गांधी सर्वोच्च न्यायालयात गेल्या. सदस्यत्व रद्द होण्यापासून वाचले. मात्र संसदेत भाषणाला निर्बंध आले. त्याचवेळी स्व. जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वात इंदिरा सरकारच्या विरोधात लोक रस्त्यावर येऊ लागले होते. इंदिरा गांधींना भीती वाटू लागली. त्यांनी निवडणुका पुढे ढकलल्या. एखादी बातमी विरोधात आली तर पत्रकाराला अटक होऊ लागली. हुकुमशाही, तानाशाहीची मर्यादा ओलांडण्यात आली, याचा आ. मुनगंटीवार यांनी उल्लेख केला.

### 'स्व. इंदिरा गांधींनी संपूर्ण देशाला बंदिशाळा केली'

श्रद्धेय अटलजी, अडवाणीजी, जॉर्ट फर्नांडीसजी यांची काय चूक होती? वंदे मातरम् म्हणणे, नमस्ते सदा वत्सले म्हणत ही मंडळी रस्त्यावर उतरली. यात काय चूक होती? त्यांना तुरुंगात टाकले आणि देशातील अधिकारांना संकुचित करण्यात आले. केवळ एका व्यक्तीच्या पदासाठी, स्वार्थासाठी हे सारे सुरू होते. न्यायाधिशांनी इंदिराजींच्या विरोधात निर्णय दिला म्हणून संपूर्ण देशाला बंदिशाळा करण्यात आली. तिरंग्यासाठी हजारोंनी प्राणांची आहुती दिली होती. पण इंदिरा गांधींनी शहिदांचा अपमान केला. पण जो देश आपल्या इतिहासातील चुका विसरतो, तो देश कधीच प्रगती करत नाही. त्यामुळे चुका लक्षात ठेवायच्याच आहेत, आणि चुका करणाऱ्यांनाही विसरायचे नाही, असेही आ. मुनगंटीवार म्हणाले.

### 'कौन चले भाई कौन चले भारत माँ के लाल चले'

माझे वडील आणीबाणीत तुरुंगात होते. मी १२ वर्षांचा होतो. आमची आर्थिक परिस्थिती बरी होती. पण आणीबाणीत तुरुंगवास भोगणारे असे अनेक होते, ज्यांच्या घरात चांगली स्थिती नव्हती. त्यांच्या कुटुंबियांना मदत करण्याचे संस्कार माझ्या आईने दिले. आम्ही वडिलांना भेटायला नागपूरला जायचो, तेव्हा बोलण्यासाठी फक्त दहा मिनिटे दिली जायची. किती दिवस तुरुंगात राहणार, हे माहिती नव्हते. हजारो कुटुंब या परिस्थितीचा सामना करत होते. पण त्यानंतर मिसाबंदीतून लोक बाहेर पडले, तेव्हा जटपुरा येथील कार्यक्रमातील 'कौन चले भाई कौन चले भारत माँ के लाल चले', 'वंदे मातरम्', 'भारत माता की जय' हे नारे आजही मला आठवतात, या शब्दांत आ. श्री. मुनगंटीवार यांनी आठवणींना उजाळा दिला.

---

## शाहू महाराज जयंती उत्साहात साजरी

# लोकनेते व्यंकटराव हिरे कनिष्ठ महाविद्यालयात अभिवादनाचा कार्यक्रम

**नाशिक । प्रतिनिधी**



महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित लोकनेते व्यंकटराव हिरे कनिष्ठ महाविद्यालयात राजर्षी शाहू महाराज जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. एस. जगदाळे यांच्या शुभहस्ते शाहू महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.या प्रसंगी डॉ. जगदाळे यांनी मनोगतातून शाहू महाराजांच्या समाजसुधारणेतील योगदान, शैक्षणिक क्रांतीसाठी घेतलेली धोरणात्मक पावले, आणि शोषित-वंचित समाजासाठी केलेल्या कार्याचे महत्त्व अधोरेखित केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाच्या संधी निर्माण करणे हेच आपल्या संस्थेचे प्रमुख ध्येय आहे, असे सांगत त्यांनी कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांच्या कार्याचीही आठवण करून दिली.

आजही शाहू महाराज आणि हिरे साहेबांचे विचार समाजाला प्रेरणा देणारे आहेत. शेवटच्या घटकापर्यंत शिक्षण पोहोचवणे हीच सामाजिक न्यायाची खरी भूमिका आहे,असेही प्राचार्य डॉ. जगदाळे यांनी नमूद केले.हा कार्यक्रम अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष अंतर्गत इतिहास विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाला उपप्राचार्या डॉ. सुचिता सोनवणे, पर्यवेक्षक प्रा. के. एन. पाटील, एनएसएस अधिकारी प्रा. विलास खैरनार, तसेच प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. वसुंधरा जाधव यांनी केले, तर प्रा. जी. डी. पवार यांनी आभारप्रदर्शन केले.

संपूर्ण कार्यक्रम सुसंघटित आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडला.

---

## विनयभंग प्रकरणात आरोपीस ६ महिन्यांचा कारावास, १ लाख दंडाची शिक्षा

# कन्नड शहर पोलिसांची प्रभावी तपासकारवाई पीडितेला न्याय मिळवून देण्यात यश

**पिशोर । प्रतिनिधी**

कन्नड तालुक्यातील मालपूर येथील शिक्षक महिलेला त्रास देत विनयभंग करणाऱ्या आरोपीला प्रथम वर्ग न्यायदंडाधिकाऱ्यांनी दोषी ठरवत सहा महिन्यांचा कारावास आणि एक लाख रुपयांचा दंड ठोठावला. ही घटना १७ जानेवारी २०१८ रोजी सायंकाळी साडेचारच्या सुमारास घडली. पीडित शिक्षिका स्कुटीवरून मालपूरहून बहिरगाव फाट्याकडे जात असताना आरोपी कैलास रावसाहेब म्हसरूप (रा. मालपूर, ता. कन्नड) याने तिचा पाठलाग करून रस्त्यात अडवले आणि जबरदस्तीने हात पकडत अश्लील प्रस्ताव दिला. माझं तुझ्यावर प्रेम आहे, मला तुझ्याशी लग्न करायचंय, तुझ्याबरोबर झोपायचं आहे, असे बोलून तिचा विनयभंग केला.

या धक्कादायक प्रकारानंतर दुसऱ्या दिवशी पीडित शिक्षिकेने कन्नड शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा क्र. १३/२०१८ नोंदवून कलम ३५४(अ)(१)(ीं), ३४१, ५०६ भादंवि अंतर्गत गुन्हा दाखल केला. प्रकरणाचा तपास पोलीस हवालदार किरण गंडे यांच्याकडे देण्यात आला. त्यांनी सखोल चौकशी करत आरोपीविरोधात सबळ पुरावे गोळा करून दोषारोपपत्र न्यायालयात सादर केले.प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी श्रीमती विजया काटकर यांच्या न्यायालयात चाललेल्या सुनावणीत शासकीय अभियोक्ता डी. ए. शेळके यांनी तक्रारदार शिक्षिकेची साक्ष, तपास अधिकारी आणि इतर पुरावे न्यायालयासमोर प्रभावीपणे मांडले. दरम्यान, कोर्टात पोलिसांतर्फे गणेश चेळेकर आणि सुशील सुरवडे यांनी पैरवीचे काम पार पाडले. सर्व पुरावे आणि युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने आरोपी कैलास म्हसरूप याला कलम ३४१ अन्वये १५ दिवस साधा कारावास, कलम ३५४(अ)(१)(ीं) नुसार ६ महिने कारावास, कलम ५०६ अंतर्गत पुन्हा ६ महिने कारावास आणि पीडित शिक्षिकेला १ लाख रुपयांची नुकसानभरपाई अदा करण्याचे आदेश दिले. दंड न भरल्यास अतिरिक्त ४५ दिवस कारावास भोगावा लागेल, असा स्पष्ट निकाल न्यायालयाने दिला.या खटल्याच्या पार्श्वभूमीवर विभागीय पोलीस अधिकारी विजयकुमार ठाकूरवाड, कन्नड शहर पोलीस ठाण्याचे निरीक्षक आर. बी. सानप, तसेच तपासी अधिकारी किरण गंडे आणि त्यांचे सहकारी हवालदार गणेश चेळेकर, अंमलदार सुशील सुरवडे यांच्या प्रयत्नांमुळे या गुन्ह्यात दोषीला शिक्षा होऊन पीडितेला न्याय मिळाला. पोलिसांनी दाखवलेली कार्यतत्परता ही उल्लेखनीय आणि समाजासाठी दिलासादायक ठरली आहे.

---

# अंमली पदार्थविरोधात लोकनेते व्यंकटराव हिरे कनिष्ठ महाविद्यालयात जनजागृती अभियान

**नाशिक । प्रतिनिधी**




महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित लोकनेते व्यंकटराव हिरे कनिष्ठ महाविद्यालय, पंचवटी नाशिक आणि आडगाव पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'नको आमली पदार्थांची नशा, होईल आयुष्याची दुर्दशा' या घोषवाक्याखाली जागतिक अंमली पदार्थविरोधी दिनानिमित्त जनजागृती अभियानाचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. एस. जगदाळे होते. तर उपप्राचार्या डॉ. सुचिता सोनवणे, प्रा. के. एन. पाटील, एन.सी.सी. अधिकारी ले. प्रा. सचिन सोनवणे, एन.एस.एस. अधिकारी प्रा. विलास खैरनार, प्राध्यापक व कर्मचारी तसेच विद्यार्थी, एन.सी.सी. कॅडेट्स आणि स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या उपक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून आडगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सदानंद काळे आणि निखील बोंडे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत अंमली पदार्थांच्या दुष्परिणामांवर सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी स्पष्ट सांगितले की, एकदा या सवयीच्या आहारी गेल्यावर संपूर्ण आयुष्य उध्वस्त होऊ शकते. यासंदर्भात एन.डी.पी.एस. कायदा १९८५ अंतर्गत गुन्हा दाखल होऊन किमान सहा महिन्यांपासून ते वीस वर्षांपर्यंत तुरुंगवास आणि दंडाची शिक्षा होऊ शकते.

प्राचार्य डॉ. जगदाळे यांनी अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, अंमली पदार्थांचे सेवन हे केवळ कायद्याच्या चौकटीत गुन्हा नसून, तो स्वतःच्या आणि कुटुंबाच्या भवितव्याला लागणारा आघात असतो. शिक्षण, आरोग्य आणि प्रतिष्ठा या सर्व गोष्टींवर त्याचा विपरित परिणाम होतो. विद्यार्थ्यांनी सजग राहून सकारात्मक विचारांच्या दिशेने वाटचाल केली पाहिजे.या उपक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. प्रकाश शेवाळे यांनी तर आभार प्रा. विजयसिंग कचवे यांनी मानले. विद्यार्थ्यांमध्ये अंमली पदार्थांविरोधात सजगता निर्माण व्हावी, त्यांना स्वतःच्या निर्णयांची जाणीव व्हावी, या उद्देशाने राबवलेले हे अभियान यशस्वी ठरले.

---

# राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने खजिनदार सन्मानित

## पहाट फाउंडेशनचा गौरव समारंभ पिशोर येथे संपन्न

**पिशोर । जावेद शेख**

पहाट फाउंडेशनतर्फे देण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी यंदा जिल्हा परिषद प्राथमिक शाळा टाकळीवाडीचे शिक्षक रघुनाथ खजिनदार यांची निवड करण्यात आली. त्यांच्या उल्लेखनीय शैक्षणिक कार्याची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला.पुरस्कारप्राप्तीनंतर पिशोर येथे आयोजित कार्यक्रमात खजिनदार यांचा सत्कार व अभिनंदन करण्यात आला. यावेळी केंद्रीय मुख्याध्यापक संतोष जाधव, प्रदीप जाधव, सदाशिव कवडे, डॉ. सुनील आदिक आणि रायभान जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. शिक्षण क्षेत्रातील आदर्शवत कार्यासाठी मिळालेला हा पुरस्कार हा शाळेसह संपूर्ण तालुक्याचा सन्मान असल्याची भावना यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली. खजिनदार यांचे विविध उपक्रमांद्वारे ग्रामीण विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेले कार्य प्रेरणादायी ठरत आहे.



---

# अंगणवाडी केंद्रात उत्साहात साजरा झाला जागतिक योग दिन

**वरोरा । प्रतिनिधी**

तालुक्यातील खैरगाव येथील अंगणवाडी केंद्रात २१ जून रोजी आनंद निकेतन कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींच्या सहकार्याने जागतिक योग दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास अंगणवाडीतील लहान मुलांसह शिक्षिका सहभागी झाल्या होत्या.

कृषीकन्यांनी चिमुकल्यांना योगाचे महत्त्व समजावून सांगत त्यांना ताडासन, वृक्षासन, पद्मासन, प्राणायाम, अनुलोम-विलोम अशा साध्या व सहज करता येणाऱ्या योगासने करून दाखवली. या वेळी मुलांना समजावून सांगण्यात आले की, नियमित योगाभ्यासामुळे शरीर निरोगी राहते, मन शांत राहते आणि अभ्यासात लक्ष केंद्रित करता येते.

अंगणवाडी शिक्षिकांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या कार्यक्रमाचा उद्देश लहान वयातच मुलांमध्ये योगाचा पाया घालून शिस्त, आरोग्यजाणीव आणि मानसिक स्थैर्य



रुजविणे हा होता. या उपक्रमात कृषीकन्या श्रुती राऊत, श्रद्धा आत्राम, प्रणाली बेद्रे, संस्कृती बाराब्दे, नोमीका बारसागडे, प्राजक्ता रामटेके, दिक्षा भगत या सहभागी झाल्या.कार्यक्रमास सरपंच संदिप दडमल, उपसरपंच रमेश वाकडे उपस्थित होते. अंगणवाडी शिक्षिकांनी कार्यक्रमास मोलाचे सहकार्य केले. या उपक्रमाचे आयोजन आनंद निकेतन कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पोतदार, रावे प्रमुख डॉ. महाजन, कार्यक्रम अधिकारी डॉ. इमडे, समन्वयक डॉ. तायडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

# पहिल्याच पावसाने देवळी शहर जलमय–नाल्यांची सफाई नाही, पाण्याच्या नियोजनाचा अभाव; लाखोंचे नुकसान

**देवळी (प्रतिनिधी)**–२६ जून रोजी झालेल्या पहिल्याच पावसात देवळी शहराचे व्यवस्थापन कोलमडले असल्याचे स्पष्ट झाले. नगरपालिकेच्या दुर्लक्षामुळे नाल्यांची सफाई न केल्याने शहरातील अनेक रस्ते, वस्ती आणि औद्योगिक परिसरात पाणी तुंबले. काही ठिकाणी पाणी घरात आणि दुकानात शिरल्याने नागरिकांची पुरती तारांबळ उडाली.शहरातील ठाकरे चौक, इंदिरानगर वस्ती आणि औद्योगिक वसाहत जलमय झाली. मुख्य नाल्यातील कचरा आणि झुडपांमुळे पाणी वाहून जाण्यात अडथळा निर्माण झाला. या अडथळ्यामुळे पावसाचे पाणी सरळ दुकानात व घरात शिरले.





औद्योगिक वसाहतीतील श्री नरसाई जिनिंग येथे ४० टन सरकी आणि इलेक्ट्रिक मशीनरी पाण्यात गेल्यामुळे मोठे नुकसान झाले. श्रीकृष्ण जिनिंग पूर्णपणे जलमय झाली होती. संजय इंडस्ट्रीजमध्ये सौरक्षण भिंत पडली तर रमण इंडस्ट्रीजमध्येही पाणी साठले. संपूर्ण वसाहतीत नाल्यांची सफाई झालेली नसल्याने पाणी रस्त्यांऐवजी जिनिंग फॅक्टऱ्यांमध्ये शिरल्याचे चित्र दिसून आले.सध्या राष्ट्रीय महामार्गावर विश्रामगृह ते खरेदी–विक्री केंद्रापर्यंत रस्ता तयार होत आहे. मात्र, रस्त्यालगत नाल्यांचे नियोजन न केल्यामुळे संपूर्ण पाणी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पटांगणात जमा झाले. रस्त्यालगतची नाली कार्यक्षम नाही हे ठळकपणे समोर आले. विलास जोशी यांच्या लेआउटमधून पाणी वाहत असल्याचे नागरिकांनी निदर्शनास आणले. शहरातील रस्त्यांप्रमाणे शेतकऱ्यांचेही मोठे नुकसान झाले. सुरेश वैद्य यांच्या सात एकर शेतात पाणी साचून बियाण्यांचे नुकसान झाले. यशोदा नदीला पूर आल्यामुळे आजूबाजूच्या शेतांतील लागवडही उद्ध्वस्त झाली. रेल्वे पुलाखालील बोगद्यात पाणी साचल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण झाला. वाहनचालकांना पाण्यातून मार्गक्रमण करावे लागले.

### पहिल्याच पावसात व्यवस्थापन कोलमडले – शहरवासीय त्रस्त, प्रशासन गप्प!

**नगरपालिकेच्या व रस्ते प्राधिकरणाच्या दुर्लक्षित नियोजनामुळे देवळीकरांवर पावसाच्या पाण्याचा कहर ओढावला आहे. लाखो रुपयांचे नुकसान झाल्यानंतरही प्रशासनाची प्रतिक्रिया मिळालेली नाही. नागरिक आता कारवाई आणि नुकसानभरपाईची मागणी करू लागले आहेत.**

### दुभाजकात माती टाकून अडचणीत भर

**देवळी शहरातील रस्त्याच्या दुभाजकात मुरमाऐवजी माती टाकण्यात आल्याने वाहन घसरून अडकत आहेत. माहूर–गोंदिया बस दुभाजकात फसल्याने प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागला.**

# भारत विद्यालयात छत्रपती शाहू महाराज जयंती उत्साहात साजरी

## सामाजिक न्यायाची प्रेरणा विद्यार्थ्यांपर्यंत

**वर्धा (प्रतिनिधी)**–समाजसुधारक, समतेचे पुजारी व बहुजनांच्या उत्थानासाठी आयुष्य झटणारे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती भारत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात सामाजिक न्याय दिन म्हणून उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्ताने विद्यार्थ्यांना सामाजिक समतेचा संदेश देणारे मनोगत, मार्गदर्शन आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले.




कार्यक्रमाची सुरुवात शाहू महाराजांच्या प्रतिमापूजनाने झाली. मुख्याध्यापक हरीश भट्टड, उपमुख्याध्यापक किशोर चवरे, पर्यवेक्षिका निलाक्षी बुरीले, मनीषा कोंडावार, ज्येष्ठ शिक्षक विनोद नांदुरकर व दत्ता भांगे यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. यानंतर विद्यार्थ्यांनी शाहू महाराजांच्या जीवनकार्यावर आधारित मनोगते सादर केली. उपमुख्याध्यापक किशोर चवरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, शाहू महाराजांनी वंचित, दलित, मागास आणि स्त्रियांसाठी आरक्षण, मोफत शिक्षण, नोकरीतील आरक्षण यांसारख्या क्रांतिकारी उपाययोजना केल्या. आजही आपण त्यांच्या विचारांचा आदर्श घेत सामाजिक न्यायासाठी काम केलं पाहिजे. शिक्षक विनोद नांदुरकर यांनी शाहू महाराजांनी सुरू केलेल्या तंत्रशिक्षण, राखीव जागा व स्त्री शिक्षण यावर भर दिला. ते म्हणाले, शाहू महाराजांचा स्त्री विषयक दृष्टिकोन आजच्या काळातही आदर्श आहे. समाजाला समतेच्या दिशेने घेऊन जाण्याचे काम त्यांनी केले. पर्यवेक्षिका निलाक्षी बुरीले यांनी 'आषाढस्य प्रथम दिवसे' या दिवसाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावले. 'मेघदूत' या कालिदासांच्या काव्यातील पहिल्या ओळीचा संदर्भ देत त्यांनी सांस्कृतिक परंपरेचा धागा जपण्याचे आवाहन केले. दत्ता भांगे यांनी जागतिक अमली पदार्थ विरोधी दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना व्यसनमुक्त जीवनशैलीचे महत्त्व पटवून दिले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन राजश्री तांबोळी यांनी तर प्रमुख मार्गदर्शन मुख्याध्यापक हरीश भट्टड यांनी केले. कार्यक्रमाला विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उत्सवमधून विद्यार्थ्यांना सामाजिक न्याय, समतेचे मूल्य आणि शाहू महाराजांच्या कार्याची प्रेरणा मिळाली, असे समाधान आयोजकांनी व्यक्त केले.

# फुले–शाहू–आंबेडकर बहुउद्देशीय संस्थेकडून सामाजिक न्याय दिन साजरा

## गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

**पुलगाव (प्रतिनिधी)**–राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंतीनिमित्त फुले, शाहू, आंबेडकर बहुउद्देशीय संस्था, पुलगाव यांच्या वतीने सामाजिक न्याय दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने पुलगावमधील चार नामांकित शाळांमधील गरजू आणि होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करून सामाजिक बांधिलकी जपण्याचा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला.या उपक्रमांतर्गत कृष्णा तायल हायस्कूल, आर.के. हायस्कूल, ज्ञानभारती हायस्कूल आणि डॉ. झाकीर हुसेन उर्दू हायस्कूल या चार शाळांमधील प्रत्येकी १० अशा एकूण ४० विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे संच देण्यात आले.




कार्यक्रमात संस्थेचे अध्यक्ष आकाश गौरखेडे, उपाध्यक्ष शशांक अंबादे, सचिव सुशील बांगर, सहसचिव सनी राऊत, कोषाध्यक्ष मयूर कांबळे, सदस्य कवीश गोरखेडे व संदीप बांगर, तसेच माजी प्राचार्य आनंद जीवने, माजी मुख्याध्यापक धर्मेंद्र अंबादे, आशिष वाघमारे, श्रेयस मानकर यांची विशेष उपस्थिती होती.


प्रत्येक शाळेच्या मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत शिक्षणाचे महत्व, सामाजिक समतेची जाणीव व शाहू महाराजांच्या कार्याची प्रेरणा दिली. कार्यक्रमाच्या आयोजनात शाळेतील शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचा मोठा सहभाग होता.

फुले–शाहू–आंबेडकर बहुउद्देशीय संस्थेच्या या उपक्रमातून सामाजिक न्याय दिनाला खरी सार्थता लाभली असून, शिक्षणाच्या माध्यमातून गरजू विद्यार्थ्यांना साथ देण्याचा प्रयत्न करण्यात आला, अशी भावना सहभागी मान्यवरांनी व्यक्त केली.

# प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत सुधारणा–शेतकऱ्यांमध्ये संभ्रम आणि नाराजी; 'किसान अधिकार अभियान'कडून सरकारला सुलभतेचा आग्रह

**वर्धा (प्रतिनिधी)**–प्रधानमंत्री पीक विमा योजना २०२५–२६ बाबत सरकारने नुकत्याच जाहीर केलेल्या सुधारित अटी आणि अंमलबजावणी प्रक्रियेवर शेतकऱ्यांमध्ये गोंधळाचे वातावरण निर्माण झाले असून, योजना प्रभावी असली तरी अंमलबजावणीत पारदर्शकता आणि सुलभतेचा अभाव प्रकर्षाने जाणवत असल्याची प्रतिक्रिया 'किसान अधिकार अभियान'चे समन्वयक ॲड. अविनाश काकडे यांनी व्यक्त केली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या २४ जून २०२५ रोजीच्या निर्णयानुसार ही सुधारित योजना खरीप २०२५ व रब्बी २०२५–२६ या हंगामासाठी लागू झाली असून, नैसर्गिक आपत्ती, अतिवृष्टी, कीड–रोग यामुळे होणाऱ्या पिकांच्या नुकसानीसाठी विमा संरक्षण देण्याचे यामागचे प्रमुख उद्दिष्ट आहे. तथापि, 'फार्मर आयडी', 'ई–क्रॉप सर्वे', पीक कापणी प्रयोग (उउए), मोबाइल ॲपद्वारे नोंदणी, आणि विमा कंपन्यांच्या अटींमुळे सर्वसामान्य शेतकऱ्यांसाठी ही योजना अधिक क्लिष्ट आणि गोंधळात टाकणारी ठरत आहे.योजनेंतर्गत शेतकऱ्यांना विमा हप्ता भरावा लागणार असून, खरीप हंगामात २ टक्के, रब्बी हंगामात १.५ टक्के आणि नगदी पिकांसाठी ५ टक्के इतका हप्ता निश्चित करण्यात आला आहे. तसेच शेतकऱ्यांनी मोबाईल ॲपद्वारे 'ई–क्रॉप सर्वे' भरून पीक नोंदणी करणे अनिवार्य करण्यात आले आहे. नुकसान झाल्यास त्याचे मूल्यांकन पीक कापणी प्रयोगाद्वारे करण्यात येईल आणि भरपाई थेट डीबीटी (ऊब्ढ) पद्धतीने बँक खात्यात जमा केली जाणार आहे.



मात्र प्रत्यक्षात या अटी पूर्ण करताना शेतकऱ्यांना तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. मोबाईल किंवा इंटरनेट सुविधेचा अभाव, शेताच्या सर्वे नंबरांबाबत अपूर्ण माहिती, उउए कोण करते आणि कधी करते याबाबत माहितीचा अभाव, तसेच 'कुशल प्रतिनिधी' किंवा शेतकरी प्रतिनिधींची निवड पद्धत यामुळे या योजनेबाबत अनेक शंका उपस्थित झाल्या आहेत. शिवाय, विमा कंपनीने नुकसान भरपाई २१ दिवसांत न दिल्यास १२ टक्के व्याज देण्याची तरतूद आहे, पण प्रत्यक्षात त्या अंमलबजावणीत सातत्याने विलंब होत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

ॲड. अविनाश काकडे यांनी यासंदर्भात म्हटले आहे की, प्रधानमंत्री पीक विमा योजना ही नक्कीच चांगल्या हेतूने आखलेली आहे, पण सध्याच्या स्वरूपात ती केवळ आकड्यांपुरती मर्यादित आहे. शेतकऱ्यांना लाभ मिळण्यासाठी विमा कंपनीच्या मध्यस्थीऐवजी जिल्हाधिकारीस्तरावर 'शेतकरी मदत निधी' तयार करून त्याद्वारे नुकसान भरपाई देण्यात यावी. तसेच योजना अधिक सुलभ व पारदर्शक व्हावी यासाठी शेतकरी प्रतिनिधींचा सहभाग आणि तांत्रिक सहाय्य अनिवार्य आहे.ही योजना यशस्वी व्हावी, तर तिला शेतकऱ्यांच्या हिताचा खऱ्या अर्थाने स्पर्श झाला पाहिजे, अन्यथा वर्षानुवर्षे योजना ही केवळ जाहिरातीपुरती आणि कागदापुरतीच मर्यादित राहील, असा इशाराही 'किसान अधिकार अभियान'कडून देण्यात आला आहे.

# धामणगाव रेल्वे तालुक्यात शेतकऱ्यांची पेरणीसाठी लगबग

## सोयाबीन, तूर व कपाशीची पेरणी जोरात

**धामणगाव रेल्वे । प्रशांत मून**

धामणगाव रेल्वे तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या समाधानकारक पावसामुळे शेतीच्या कामांना चांगलाच वेग आला असून, शेतकरी वर्ग उत्साहाने शिवारात उतरला आहे. मागील आठवड्यापर्यंत ढगाळ वातावरण असले तरी पावसाने पाठ फिरवली होती. मात्र सध्या संततधार पावसामुळे जमीन ओलसर झाल्याने शेतकरी बैलजोडी आणि ट्रॅक्टरच्या साह्याने सोयाबीन, तूर व कपाशीची पेरणी जोरात सुरू करत आहेत.

अचानक मोठ्या प्रमाणावर पेरणीस प्रारंभ झाल्यामुळे बियाण्यांच्या मागणीत वाढ झाली असून काही कंपन्यांच्या बियाण्याच्या दरात रातोरात लक्षणीय वाढ झाली आहे. मयूर आणि खंडेलवाल कंपनीच्या ३० किलो वजनाच्या सोयाबीन बियाण्याच्या पिशव्या २२०० रुपयांवरून थेट २६०० रुपयांवर पोहोचल्या आहेत. दरवाढीने शेतकऱ्यांमध्ये चिंता निर्माण झाली आहे.


दरम्यान, पेरणीसाठी अत्यावश्यक असलेल्या खतांचा तुटवडा भासत असून, विशेषतः ऊ–झ खताची मोठ्या प्रमाणात टंचाई जाणवत आहे. परिणामी, शेतकरी पर्यायी उपाय म्हणून २०:२०:०:१३ या मिश्र खताचा वापर करत आहेत. याशिवाय, सोयाबीनसाठी झिंक, बोरोन व सिंगल सुपर फॉस्फेट (डडझ) खतांचा वापर देखील मोठ्या प्रमाणात सुरू आहे.या वर्षी योग्य वेळेत आणि पुरेशा पावसात पेरणी सुरू झाल्याने शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसत आहे. यावर्षी चांगले उत्पादन होऊन त्याला योग्य बाजारभाव मिळावा, अशी आशा बळीराजा व्यक्त करत आहे. मात्र खतांचा पुरवठा सुरळीत करणे आणि बियाण्याच्या दरावर नियंत्रण ठेवणे ही प्रशासनासमोरील महत्त्वाची जबाबदारी ठरू शकते. वेळेत उपाययोजना न झाल्यास शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## डिगडोह येथील यशोदा नदीत अडकलेल्या तीन विद्यार्थ्यांची यशस्वी सुटका

# आ.राजेश बकाने भर पावसात स्वतः घटनास्थळी पोलीस व अग्निशमन विभागाचे तत्काळ बचावकार्य

**देवळी (प्रतिनिधी)**–गेल्या काही दिवसांपासून पडणाऱ्या जोरदार पावसामुळे देवळीपासून अवघ्या तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या डिगडोह गावाजवळील यशोदा नदीला पूर आला असून, आज दुपारी नदीपात्रात पाणी अचानक वाढल्याने तीन विद्यार्थी अडकले. सुदैवाने तातडीच्या व योग्य बचावकारवाईमुळे तिघांचीही सुखरूप सुटका करण्यात यश आले.

भावेश कापसे (रा. डिगडोह), प्रज्वल सावरखेडे व उमेश साखरकर (दोघे रा. नागझरी) हे विद्यार्थी डिगडोह–देवळी रस्त्यावरून जात असताना नदीवरील नवीन पूल अद्याप पूर्ण न झाल्यामुळे जुन्या मार्गाने नदी ओलांडत होते. मात्र पाण्याचा प्रवाह अचानक वाढल्याने ते तिघे नदीच्या मध्यभागी अडकले. या घटनेची माहिती मिळताच देवळी–पुलगाव विधानसभा क्षेत्राचे आमदार राजेश बकाने यांनी भर पावसात घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी तातडीने ठाणेदार अमोल मंडळकर व तहसीलदार समर्थ क्षीरसागर यांच्याशी संपर्क साधून बचाव कार्याची सूचना दिली.







यावेळी देवळी पोलीस स्टेशन व नगर परिषदेच्या अग्निशमन दलाने तत्काळ हालचाली सुरू केल्या. ठाणेदार अमोल मंडळकर यांच्या मार्गदर्शनाखाली वर्धा पोलीस रेस्क्यू टीम घटनास्थळी दाखल झाली. त्याचबरोबर देवळी नगर परिषदेचे अग्निशमन जवानही घटनास्थळी पोहोचले. संयुक्तपणे राबवण्यात आलेल्या बचाव मोहिमेमुळे तिन्ही विद्यार्थ्यांची सुरक्षितपणे सुटका करण्यात आली. या घटनेबाबत आमदार बकाने यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, माझ्या मतदारसंघातील सुमारे १२ ते १३ गावे दरवर्षी पुरामुळे वेढली जातात. यंदा आम्ही काही ठिकाणी पूर प्रतिबंधक उपाययोजना केल्या आहेत. नागरिकांनी कुठेही पूरस्थिती उद्भवली, तर मला थेट फोन करावा – मी स्वतः घटनास्थळी पोहोचेन. या धाडसी व समन्वयपूर्ण बचाव कार्यात ठाणेदार अमोल मंडळकर यांच्या नेतृत्वाखाली शिवा कुमरे, सत्यम शिंदे, नितीन शेडगे, वैभव करपे, संग्राम साबळे, दत्ता मोरे, तसेच देवळी नगर परिषदेचे अग्निशमन अधिकारी विशाल नाईक, फायरमन अक्षय क्षीरसागर, आसिफ शेख, रंजीत दाभेकर यांचा मोलाचा सहभाग होता.ही बचावमोहीम केवळ यशस्वी नव्हती, तर प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि आपत्कालीन सेवांमधील उत्तम समन्वयाचे आदर्श उदाहरण ठरली आहे.

# रस्ता की खड्डा?–श्रमजीवी संघटनेचं नऊ ठिकाणी एकाचवेळी तीव्र आंदोलन

## साडेसात तास ठप्प वाहतूक, प्रमोद पवार यांचा प्रशासनाला इशारा





**पालघर | प्रतिनिधी**

भिवंडी-वाडा-मनोर महामार्गाच्या भीषण दुरवस्थेविरोधात श्रमजीवी संघटनेने गुरुवारी मोठ्या प्रमाणावर रस्ता रोको आंदोलन छेडले. सकाळी ११.३० पासून सायंकाळी ६.५० वाजेपर्यंत सलग साडेसात तास हे आंदोलन सुरू राहिले. संघटनेचे नेतृत्व प्रमोद पवार यांनी केलं असून, एकाच वेळी तालुक्यातील नऊ ठिकाणी हे आंदोलन छेडण्यात आलं. या आंदोलनामुळे संपूर्ण मार्गावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती, तर रस्त्यावर अडकलेल्या प्रवाशांत तीव्र संताप उसळला.भिवंडी तालुक्यात अंबाडी, कवाड, नादीठणे, मालोडी आणि वाडा तालुक्यात कुडूस, डाकीवली, शिरीषपाडा, खंडेश्वरी नाका तसेच वसईतील कामण येथे हे रस्ता रोको करण्यात आले. आंदोलकांनी ठिकठिकाणी ठिय्या मांडून घोषणाबाजी केली. काही ठिकाणी आंदोलनात महिलांची व विद्यार्थ्यांचीही सहभाग होता. सतत वाहतूक कोंडी आणि अपघातांच्या घटनांमुळे हैराण झालेल्या ग्रामस्थांनी या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

गेल्या अनेक महिन्यांपासून भिवंडी-वाडा-मनोर महामार्गाची अवस्था अत्यंत गंभीर झाली असून, मोठमोठे खड्डे, वाहून गेलेली डांबरी थर आणि चिखलामुळे प्रवास अत्यंत कठीण झाला आहे. या मार्गावरून दररोज हजारो वाहनधारक, शेतकरी, कामगार आणि विद्यार्थी प्रवास करत असून त्यांना अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे काही भागांत नव्याने केलेला रस्तादेखील काहीच महिन्यांत उखडला आहे. यावरून ठेकेदार आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या हलगर्जीपणाची स्पष्ट कल्पना येते, असे मत ग्रामस्थांनी व्यक्त केले.या गंभीर समस्येबाबत श्रमजीवी संघटनेने यापूर्वीही प्रशासनाला निवेदन दिली होती. मात्र काहीही हालचाल न झाल्याने अखेर संघटनेला रस्त्यावर उतरावे लागले, असे प्रमोद पवार यांनी सांगितले. प्रशासनाने जर याहीवेळी दखल घेतली नाही, तर पुढील टप्प्यात अजून तीव्र आंदोलन उभारले जाईल असा इशाराही त्यांनी दिला.ग्रामस्थांनी महामार्गाचे तातडीने डांबरीकरण करून खड्डे बुजवावेत, पावसाळ्यापूर्वी संपूर्ण मार्ग सुरक्षित करावा, आणि झालेल्या दुर्लक्षाबद्दल संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी यावेळी केली. रस्त्याच्या दुरवस्थेमुळे लोकांच्या संयमाचा अंत झाला असून, आता ही लढाई नुसती वाहतुकीची नसून, ती हक्काची आहे, असा ठाम संदेश आजच्या आंदोलनातून मिळाला.

## रस्त्यात खड्डे की खड्ड्यात रस्ते?

# पालघरच्या खडकोलीत रस्त्यांची दयनीय अवस्था; ग्रामस्थ संतप्त

**पालघर | प्रतिनिधी**



तालुक्यातील तांदुळवाडी-चहाडे मार्गावरील खडकोली गावात साईबाबा मंदिरासमोरील मुख्य रस्ता इतका खराब झाला आहे की ग्रामस्थ थेट प्रश्न विचारू लागले रस्त्यात खड्डे आहेत की खड्ड्यात रस्ताच आहे?

पावसाळ्याच्या सुरुवातीलाच या रस्त्यावर खोल खड्डे, साचलेले पाणी आणि चिखल यामुळे नागरिकांची वाहतूक धोकादायक बनली आहे. शाळकरी मुले, वृद्ध नागरिक आणि दुचाकीस्वार यांचे हाल सुरू असून, वाहनचालकांसाठी हा मार्ग जीवघेणा ठरत आहे. सातिवलीतील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी अनेक वाहनचालक पर्यायी म्हणून तांदुळवाडी-वरळी मार्ग वापरत असले तरी या मार्गाचीही अवस्था तितकीच वाईट आहे. यावर्षीच तयार झालेल्या रस्त्यावर काही महिन्यांतच खड्डे पडले असून, नव्याने बांधलेल्या मोऱ्याही धोक्यात आल्या आहेत. साचलेल्या पाण्यामुळे आणि चिखलामुळे अपघातांचे प्रमाण वाढले असून, काही दुचाकीस्वार किरकोळ जखमीही झाले आहेत. वेगात जाणाऱ्या वाहनांना खड्डे न दिसल्याने थेट धडकण्याची शक्यता वाढली आहे. ग्रामस्थांनी अनेक वेळा ग्रामपंचायत व सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तक्रारी केल्या असूनही प्रशासनाने अद्याप कोणतीही ठोस कारवाई केलेली नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये संताप उसळला आहे. पावसाआधी रस्ता डांबरीकरण करून कायमस्वरूपी उपाय करावा, दोषी ठेकेदारांवर चौकशी करून कारवाई करावी अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल,असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. स्थानिक प्रशासनाने या गंभीर समस्येकडे तातडीने लक्ष द्यावे, अशी जोरदार मागणी खडकोली परिसरातील जनतेकडून होत आहे.

# करमाळा पोलीस स्टेशन व यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने अमली पदार्थ विरोधी जनजागृतीसाठी पथनाट्याचे आयोजन

**सोलापूर | प्रतिनिधी**



करमाळा पोलीस स्टेशन व यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थिनींच्या संयुक्त विद्यमाने जागतिक अमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त जनजागृतीपर पथनाट्याचे आयोजन करमाळा बस स्थानक येथे करण्यात आले.या पथनाट्याच्या माध्यमातून अमली पदार्थांचे व्यसन हे शरीरासाठी आणि समाजासाठी किती घातक आहे हे प्रभावीपणे उभे करण्यात आले. बसस्थानकावर मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या प्रवासी नागरिकांनी या सादरीकरणाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून करमाळा पोलीस ठाण्याचे निरीक्षक रणजित माने, यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचे प्रा. दास , तसेच आदिनाथ सहकारी साखर कारखान्याचे संचालक राजाभाऊ कदम उपस्थित होते.निरीक्षक रणजित माने यांनी आपल्या भाषणात म्हटले की, तरुणाई ही देशाची शक्ती आहे, आणि ती जर अमली पदार्थांच्या विळख्यात अडकली, तर संपूर्ण समाजच कमकुवत होतो. त्यामुळे अशा प्रकारच्या उपक्रमांमधून जे जागृतीचे कार्य विद्यार्थी करत आहेत, ते अत्यंत कौतुकास्पद आहे.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी पोलीस कर्मचारी दळवे, शेळके, महाविद्यालयातील प्रा. सुजाता भोरे, इतर प्राध्यापक वर्ग यांनी विशेष मेहनत घेतली. कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. भोरे यांनी उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमाला पत्रकार आलिम शेख, विशाल परदेशी, दिनेश घोलप यांच्यासह विविध मान्यवरांची उपस्थिती लाभली. पथनाट्याच्या माध्यमातून नको अमली पदार्थांची नशा होईल आयुष्याची दुर्दशा हे प्रभावी संदेश समाजापर्यंत पोहचवण्यात आला.

# लुपिन फाउंडेशन सीएसआरच्या माध्यमातून पिशोर ग्रामीण रुग्णालयात ट्रूनॅट मशिनचे लोकार्पण

## टीबी निदानासाठी मिळणार जलद आणि अचूक सुविधा

**पिशोर | जावेद शेख**




ग्रामीण भागातील आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यासाठी लुपिन फाउंडेशन सी.एस.आर. यांच्या माध्यमातून पिशोर ग्रामीण रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाला ट्रूनॅट मशिन भेट देण्यात आली. २६ जून गुरुवारी या अत्याधुनिक मशिनचे उद्घाटन करण्यात आले.टीबी (क्षयरोग) सारख्या गंभीर आजाराच्या जलद निदानासाठी ही ट्रूनॅट मशिन आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज असून, यामुळे संशयित रुग्णांचे नमुने आता स्थानीय पातळीवरच तपासता येणार आहेत. यापूर्वी या तपासण्या कन्नड ग्रामीण रुग्णालयात पाठवाव्या लागत होत्या, मात्र आता एका तासात रिपोर्ट उपलब्ध होणार आहे, त्यामुळे रुग्णांना तातडीने उपचार मिळवता येतील.

कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी लुपिन फाउंडेशनचे सीनियर मॅनेजर (ऑल इंडिया) व्यंकटेश शेटे, ग्रामीण रुग्णालय कन्नडचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अनिरुद्ध गायकवाड, पिशोर ग्रामीण रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. धीरज पाटील, गोकुळ डहाके, मा. सरपंच साळवे , रुग्ण कल्याण समिती सदस्य भानुदास सुरडकर, तसेच रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी डॉ. अमोल गिरी, डॉ. धोंडिया, डॉ. अमोल घोडके, मुख्य अधिपरिचारिका अर्चना सुरासे, आणि सर्व आरोग्य कर्मचारी उपस्थित होते.या उपक्रमामुळे पिशोर परिसरातील रुग्णांना वेळेवर निदान व उपचार मिळणार असून, आरोग्य यंत्रणेसाठी ही एक महत्त्वाची भर ठरणार आहे. उपस्थित मान्यवरांनी लुपिन फाउंडेशनच्या उपक्रमाचे कौतुक करत त्यांचे आभार मानले.

# ओम जय माऊली मित्र मंडळा तर्फे विठ्ठल-रखुमाई दिंडी सोहळ्याचे आयोजन

## ५ जुलै रोजी चंदनबाळा ते वडाळा दरम्यान होणार भव्य पदयात्रा

**मुंबई | प्रतिनिधी**

विठ्ठल म्हणजेच पांडुरंग! महाराष्ट्राचा लाडका देव म्हणून विठोबा किंवा पांडुरंग या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या देवाचा वारकरी सांप्रदायामध्ये विशेष महिमा आहे. विठोबा म्हणजेच विटेवर उभे राहून आपल्या भक्त पुंडलिकाची वाट पाहणारे दैवत. म्हणूनच प्रत्येकवर्षी, आषाढी एकादशीला, वारकरी दिंडीने पंढरपूरकडे मार्गक्रमण करतात. या दिंडीमधून टाळकरी, विणेकरी, अभंग गाणारे व विठोबाचे नामस्मरण करणारे वारकरी सहभागी होतात.याच वारकरी परंपरेचे जतन करणाऱ्या ओम जय माऊली मित्र मंडळा तर्फे चंदनबाळा, वाळकेश्वर, मुंबई येथे विठ्ठल-रखुमाई दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. दरवर्षीप्रमाणे या वर्षीदेखील महिला डोक्यावर तुळशी वृंदावने घेऊन सहभागी होतील. राम कृष्ण हरी माऊली माऊली ज्ञानोबा तुकाराम असा जयघोष करीत, गीत-भजन-कीर्तनासह आणि वादळवाऱ्याचा सामना करीत भाविक ही दिंडी पार पाडणार आहेत.दिंडी सोहळ्याचा शुभारंभ शनिवार, दिनांक ५ जुलै २०२५ रोजी रात्री ९.३० वाजता चंदनबाळा येथून होणार आहे. त्यानंतर रिझ रोड, वाळकेश्वर, बाबुलनाथ, पेडर रोड, हाजी अली, सिध्दिविनायक मंदिर मार्गे वडाळ्यातील विठ्ठल-रखुमाई मंदिर येथे दिंडीचा समारोप होईल.दिंडीचे पुरस्कर्ते संजय शिर्के असून मंडळाचे अध्यक्ष रमेश कळंबाटे, उपाध्यक्ष शैलेश शिगवण आणि सहकाऱ्यांनी भाविकांना या पवित्र पदयात्रेत सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. भाविकांच्या सुलभतेसाठी दिंडीनंतर परतीच्या प्रवासाची वाहन व्यवस्था करण्यात आली आहे.

अधिक माहितीसाठी संपर्क:
रमेश कळंबाटे : ९७५७३८६५९४
नरेश मोरे : ७०३९४९८६९९

# रांजणगाव पोळ येथे कृषिदुतांकडून शेतीविषयक पचे प्रात्यक्षिक सादर

**वैजापूर | अर्जुन शिंदे**



वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठांतर्गत दादासाहेब पाटील कृषी महाविद्यालय, दहेगाव (ता. वैजापूर) येथील कृषिदुतांकडून रांजणगाव पोळ (जि. छत्रपती संभाजीनगर) येथे शेतीविषयक पचे प्रभावी प्रात्यक्षिक सादर करण्यात आले.या कार्यक्रमात 'ग्रोस्टार' या पबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. हे प गुगल प्ले स्टोअरवर विनामूल्य उपलब्ध असून शेतकऱ्यांना पीक सल्ला, खत वापर, कीड व रोग नियंत्रण, हवामान अंदाज आदी उपयुक्त माहिती सहज मिळवता येते, याचे मार्गदर्शन कृषिदुतांनी शेतकऱ्यांना दिले.कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. बैनाडे, कार्यक्रम अधिकारी प्रा. एस. बी. बडे, प्रा. एस. वी. गुंड, सरपंच सुनिता शेलार, ग्रामसेवक , सहाय्यक कृषी अधिकारी व्ही. हिवाळे तसेच गावातील जेष्ठ नागरिक, शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या उपक्रमात कृषिदूत विक्रम ढोके, विजय कंटुले, विजय साखरे, आदित्य भांडवले, आदित्य खवले, तेजस देवकर, ऋत्विज गायकवाड, अथर्व कदम, रविंद्र कोळसे, योगेश कणसे यांनी पविषयी सविस्तर माहिती सादर करत शेतकऱ्यांचे समाधानकारक शंकानिरसन केले.शेतीत तांत्रिकतेचा अधिक वापर होण्यासाठी अशा प्रात्यक्षिक उपक्रमांची गरज असून, कृषिदुतांचे हे कार्य कौतुकास्पद असल्याचे मत यावेळी मान्यवरांनी व्यक्त केले.

# श्री नागेश्वर व्यापारी संघातर्फे वारकऱ्यांसाठी फलाहार वाटप; सामाजिक बांधिलकीचे दर्शन

**पाटस | योगेश राऊत**



जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्याचे आगमन कसबे पाटस येथे उत्साहात झाले. सकाळी साडेआठ वाजता श्री तुकोबारायांच्या पालखीने श्री नागेश्वरांची पुण्यभूमी गाठताच गावकऱ्यांनी व व्यापाऱ्यांनी एकत्र येत भव्य स्वागत केले. या स्वागतप्रसंगी नव्याने स्थापन झालेल्या श्री नागेश्वर व्यापारी संघ व ग्रामस्थांच्या वतीने वारकऱ्यांसाठी सुमारे एक हजार किलो केळी वाटप करण्यात आले. 'पालखी सेवा हेच खरे पुण्य' या भावनेतून हाती घेतलेल्या या फळे वाटप उपक्रमाला वारकऱ्यांनी मोठा प्रतिसाद दिला. सकाळच्या वाटचालीनंतर हा फलाहार त्यांच्या साठी टॉनिक ठरला.

या उपक्रमात मिथुन शितोळे, हर्षद बंदीष्टी, विठ्ठल वाळुंजकर, शैलेंद्र पंडित, गणेश सुळ, अमित पवार, संतोष खरात, अजिंक्य कुदांडे, सुनील शिवतारे, विठ्ठल आव्हाड, महेश भागवत, शरद शितोळे, सचिन शितोळे, सोमनाथ बिनवडे, सोमनाथ ढमाले, पांडुरंग बनकर, प्रमोद ढमाले, तानाजी केकाण, संतोष वरघडे, प्रशांत शितोळे, अनिरुद्ध पानसरे, अभिजित भागवत, गणेश शितोळे आदींनी पुढाकार घेतला.श्री नागेश्वर व्यापारी संघाचे पदाधिकारी, सदस्य, व्यापारी बंधू आणि ग्रामस्थ यांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली होती.या उपक्रमामुळे पाटस गावाने आपली सामाजिक बांधिलकी दाखवत वारकऱ्यांच्या सेवेचा अनोखा आदर्श उभा केला आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .